लोकमत

# विद्यापीठ परीक्षांचे निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने शनिवारी बी.ए. सेमिस्टर एक व दोन, संगीत शास्त्र अशा नऊ परीक्षांचा निकाल जाहीर केला आहे. आतापर्यंत विद्यापीठाने ४२० अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२१ च्या परीक्षा कोरोना संसर्गामुळे १० ऑगस्टपासून ऑनलाईन पद्धतीने सुरु केल्या आहेत. शनिवारपासून पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या परीक्षांना प्रारंभ झाला. एम. ए., एम. कॉम, एम.एस्सी, एम.एस.डब्लू, एम.सी.ए या अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या त्यामध्ये समावेश आहे. तांत्रिक अडचणीमुळे परीक्षा न देऊ शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी पुनर्परीक्षा सुरु झाल्या असून त्याअंतर्गत बी.ए., बी.कॉम,एम.ए., एम.कॉमच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या. शनिवारी झालेल्या परीक्षेसाठी ११७४ पैकी १०८९ विद्यार्थी उपस्थित होते.

ऑनलाईन परीक्षेत काही अडचण येऊ नये, यासाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली होती. ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुरु झालेली नाही त्यांनी मॉक टेस्ट द्यावी म्हणजे त्यांच्या मुख्य परीक्षेत अडचण येणार नाहीत असे शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्यावतीने जाहीर केले आहे.



## कोणते निकाल जाहीर..

- एमपीए व्होकल म्युझिक-भाग १
- एमपीए इनस्ट्रमेंटल म्युझिक-भाग१
- एम.ए.हिंदी सेमीस्टर १ व २
- एम.ए. सायकॉलॉजी सेमी. १ व २
- एम.ए, पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन सेमीस्टर २
- बी.ए.सेमीस्टर १ व २

## एम.फिल, पीएच.डी साठी प्रवेश परीक्षा

एम.फिल, पीएच.डी साठी प्रवेश परीक्षा २६ ते २८ ऑक्टोबरला होणार आहे. ही परीक्षा कोल्हापुरातील दसरा चौकातील शहाजी छत्रपती महाविद्यालयात, सांगलीतील श्रीमती मथूबाई गरवारे कन्या महाविद्यालयात, सातारा येथे यशवंतराव चव्हाण सायन्स इन्स्टिट्यूटमध्ये होणार आहे. या परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्याचे विद्यार्थ्यांनी अवलोकन करावे असे आवाहन परीक्षा विभागाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.

लोकमत

# सहकार हा समृद्धीकडे नेणारा मार्ग : ओऊळकर

## शिवाजी विद्यापीठात प्रशिक्षण कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सहकार हा समृद्धीकडे



नेणारा मार्ग आहे. त्याच्याशी संबंधित घटकांमध्ये त्या अनुषंगाने माहिती आणि जाणीव असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन माजी पणन संचालक दिनेश ओऊळकर यांनी केले.

भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ, शिवाजी विद्यापीठातील बँक ऑफ इंडिया चेअर इन रुरल बँकिंग आणि रवळनाथ को-ऑप. हाउसिंग फायनान्स सोसायटी लिमिटेडतर्फे आयोजित सभासद प्रशिक्षण कार्यशाळा विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात झाली. त्यावेळी त्यांचे बीजभाषण झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते.

महाराष्ट्रातील आणि कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळ अतिशय बळकट असून, ६० टक्के पीककर्जाचे वाटप सहकारातूनच होते. भांडवलावर मर्यादित लाभांश, तसेच सभासदांना विविध प्रकारचे लाभ सहकारी संस्था देतात. या बळावरच कृषी आणि पणन हे विभागही सक्षम होण्यास हातभार लागत असतो. सभासदांना त्यांचे हक्क, जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये यांची जाणीव असल्यास सहकाराची वाटचाल योग्य दिशेने राखता येते.

त्या दृष्टीने अशा प्रकारच्या कार्यशाळा होणे गरजेचे असल्याचे ओऊळकर यांनी सांगितले. महेश धर्माधिकारी, डॉ. विजय ककडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रकुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, 'रवळनाथ'चे संस्थापक अध्यक्ष एम.एल. चौगुले, विजय हरगुडे आदींची उपस्थिती होते. डॉ. एम.एस. देशमुख यांनी स्वागत केले. प्राचार्य निळपणकर यांनी आभार मानले.

लोकमत

# विद्यापीठाने केला ओंकार कॉलेजचा विशेष गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज :** शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय ऑनलाईन युवा महोत्सव कार्यशाळेचे यशस्वी नियोजन केल्याबद्दल विद्यापीठातर्फे गडहिंग्लज येथील ओंकार शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचा गौरव करण्यात आला.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. सुरेशराव चव्हाण व डॉ. शर्मिला घाटगे यांचा सत्कार करण्यात आला. याकामी संस्थाध्यक्ष राजन पेडणेकर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यशाळा समन्वयक ज्ञानराजा चिघळीकर यांनी नियोजन केले.

लोकमत

# सतीश पाटील अभ्यासमंडळावर

गारगोटी : येथील मौनी विद्यापीठाच्या



कर्मवीर हिरे महाविद्यालयातील दोन विभागप्रमुखांची शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासमंडळावर सदस्य म्हणून नुकतीच निवड झाली. महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. सतीश मधुकर पाटील यांची आणि गणितशास्त्र विभागप्रमुख डॉ. संताजी श्रीकांत खोपडे यांची अभ्यासमंडळावर सदस्य म्हणून निवड झाली आहे. .

लोकमत

# 'कुंभार कॉमर्स'ला स्वायत्तता दर्जा

## रजनी मगदूम : व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम सुरू करणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कौन्सिल ऑफ एज्युकेशन संचालित येथील देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोगाने स्वायत्ततेचा दर्जा दिला. यामुळे महाविद्यालय पातळीवर निर्णय घेण्याचे अधिकचे स्वातंत्र्य मिळतील. परिणामी नवीन व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम सुरू करता येतील, अशी माहिती कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनी मगदूम, संचालक डॉ. विश्वनाथ मगदूम यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या तज्ज्ञ समितीने पायाभूत सोयीसुविधा, शैक्षणिक गुणवत्ता, अभ्यासेत्तर उपक्रम, सांस्कृतिक व क्रीडा विभागातील विद्यार्थ्यांच्या यशाची दखल घेत महाविद्यालयास स्वायत्तता दर्जा देण्याबाबत शिफारस केली. त्यानंतर शिवाजी विद्यापीठाने महाविद्यालयास स्वायत्ततेचा दर्जा दिला. सध्या या महाविद्यालयात एकूण पाच हजार विद्यार्थी शिक्षण घेतात.

कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनी मगदूम, उपाध्यक्ष प्रसाद कामत, सचिव ॲड. व्ही. एन. पाटील, संचालक डॉ. विश्वनाथ मगदूम, ॲड. वैभव पेडणेकर यांनी स्वायत्तता दर्जासाठी वेळोवेळी, तर डॉ. एस. बी. राजमाने यांनी मुख्य समन्वयक म्हणून काम पाहिले. डॉ. आय. एस. मुलाणी, डॉ. शरद बनसोडे, अजित पाटील यांनी परिश्रम घेतले.



कोल्हापुरातील कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनी मगदूम, डॉ. विश्वनाथ मगदूम यांनी शनिवारी स्वायत्ततेचा दर्जा मिळाल्याची माहिती दिली.

### नवीन कोर्सेस सुरु करणार

भविष्याचा वेध घेऊन महाविद्यालयात कर व्यवस्थापन, बँकिंग, संभाषण कौशल्य, रिटेल मॅनेजमेंट, टॅली, बौद्धिक संपदा अधिकार, योगा आदी नवीन कोर्सेस सुरु केले जातील. अशा कोर्सेसमुळे विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण मिळेल, अशी माहिती प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठ दूरशिक्षण केंद्रामार्फत चार नवे ऑनलाईन अभ्यासक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रामार्फत या वर्षापासून चार अभ्यासक्रम ऑनलाईन स्वरूपात सुरू करण्याच्या प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाली आहे. यात एम.बी.ए., एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) व एम.एस्सी. (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. ए.एम. सरवदे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठास 'नॅक' (बंगळूर) यांचे 'ए++' मानांकन प्राप्त झाल्यानंतर नवी दिल्ली येथील अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्याकडून विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून ऑनलाईन अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता मिळाली आहे. यात नियमित एम.बी.ए.च्या बरोबरच ऑनलाईन एम.बी.ए., एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) आणि एम.एस्सी. (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. यामुळे केवळ राज्य, देश नव्हे तर विदेशातील विद्यार्थ्यांनाही शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन शिक्षण घेण्याची संधी प्राप्त होणार आहे. हे अभ्यासक्रम सध्याच्या बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवण्यास उपयुक्त असल्याने त्यांना विद्यार्थ्यांचा उत्साही प्रतिसाद लाभेल, असे डॉ. सरवदे यांनी सांगितले.



शिवाजी विद्यापीठातून

10 OCT 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वास्तुकर्मी बाळ बेनाडीकर

वैदिक धर्मानुसार राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी १९२० साली क्षात्रजगद्गुरू पदावर श्री. सदाशिवराव बेनाडीकर-पाटील या विद्वान गृहस्थांना नियुक्त केले व पहिले अधिकारपद दिले. राजर्षींच्या महानिर्वाणानंतर स्वतंत्र भारताचे दोनवेळा विधानपरिषदेचे आमदारपद त्यांनी विभूषित केले होते. हाच पुरोगामी वारसा त्यांचे कनिष्ठ चिरंजीव श्री. विजयसिंह ऊर्फ 'बाळ' हे आजपर्यंत सांभाळत होते.



बाळचा माझा परिचय तसा पुण्यातला. तो वास्तुकलेच्या शाळेत असताना अजंठा वसतिगृहामध्ये राहायचा. मला एक वर्ष सीनिअर; पण त्याने स्वतःला तेथे शहरी वारं कधीच लावून घेतलं नाही. परीटघडीची पांढरी शुभ्र विजार व शर्ट आणि लांबूनच त्याची तालेवार चाल पाहून पुणेकर ओळखायचे, की हा अस्सल कोल्हापुरी आहे. कोल्हापूरच्या मातीतले गुण त्याच्या आन, बान आणि शानमधून डोकावायचे, तेव्हा आमची नसलेली छाती फुगून यायची. त्याचा मुलायम सावळा रंग त्याच्या भारदस्त कमावलेल्या शरीराला शोभून दिसे. वास्तुकलेच्या आम्ही पदव्या घेतल्या आणि रोजी-रोटीसाठी पांगले गेलो; पण पुढे तो अनेक दिवसांनी पुन्हा दिसला तो 'वास्तू'तूनच.

तेव्हा कोल्हापूर हे आडवळणी, भलंमोठं खेडंच होतं. सर्व संस्थानिक खानदानी आभा होती. शहराला अर्बन लूक येण्यास इथली मंडळी जात्याच सरंजामी वृत्तीचीच असल्याने थोडी अटकळच होती. काँक्रिट या वास्तू-घटकाने अद्याप आपले खरे अस्तित्व सिद्ध करण्यास सुरुवात केलेली नव्हती. स्थापत्यशास्त्रातील पहिल्या फळीतील बेरी, सूर्यवंशी, दिगे, शिंदे, आचरेकर या अभियंत्यांनी काँक्रिटला प्रमाण मानून शहरीकरणाला भक्कम सुरुवात केली होती; पण त्याला कोल्हापुरी मातीचा, इथल्या संस्कृतीचा तोंडावळा वेगळा होता. बाळ हे वास्तुकलेचं खणखणीत नाणं होतं. त्याला घरंदाज व उच्च वैचारिकतेचा वारसा लाभल्याने त्याच्याभोवती श्रीपतराव बोंद्रे, शामराव शिंदे, ए. डी. शिंदे, लोहिया, व्ही. टी. पाटील हे खंदे पुरस्कर्ते जमा झाले. त्यांच्या वास्तू चितारताना वास्तुकलेतील जी एक शिस्तबद्ध बैठक असते, त्याने त्याला कधीही धक्का दिला नाही. संस्थाने जरी कालानुरूप खालसा झाली असली तरी वास्तुकलेतून तो त्याच्या वैभवाची छाप चिरंतायी करी. त्यामुळे शाहू, सायबर, शांतादेवी गायकवाड या शिक्षण संस्था तसेच अर्बन, कमर्शियल बँकांसारख्या व्यापारी, उदिमांच्या वास्तूला सर्जनशीलता प्राप्त झाली.

शिवाजी विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीच्या विस्तारीकरणात तेथील कमानीला थोडे फनेल करून वातायने व झरोकेचे पृष्ठभाग पसरट केले व त्याच्या गोथिक-ट्युडर शैलीने त्याला भव्यता आणली. दर्शनी ढेलजवर (पोर्च) डेरेदार कुमुदरूपी घुमट करून दोन्ही बाजूस हिंदू शैलीतील छत्र्या व चबुतरे उभारून संध्यासमयीच्या क्षितिजरेषेला उठावपणा दिला. याखाली काँक्रिटचा पाणझुकाव करून त्याखाली अनेक वेळक्यांनी त्याचा डोरा समृद्ध केला.

भवानी मंडपातील शेतकरी बझार वास्तूचे आंदोलन ही त्यांची कसोटी होती. त्या परिसरातील रियासतीचा ठेवा यास धक्का न लावता 'हेरिटेज' हा विषय यशस्वीपणे त्यांनी हाताळला. इतिहास व आधुनिक विकास याचा योग्य मेळ घातला व शेतकरी मॉलची लक्षणीय उभारणी मध्यवर्ती जागेत केली. कोल्हापुरातील अपार्टमेंट स्कीममध्ये ते अग्रणी होते.

प्रभाकर प्लाझा, पॅटसन, दीप्ती व भास्कर प्लाझा असे असंख्य प्रकल्प त्यांनी उभारले. आयुष्यभर त्यांनी शाकाहारी व्रत जपले. व्यसनाला त्यांनी कधीही शिवले नाही. वडिलोपार्जित हत्ती, घोडा व गाडी यांचे वैभव असतानाही ते शहरातून दुचाकीवरून आरामात फेरफटका मारत. प्रतिष्ठेचा कोणताही बडेजाव ते मिरवत नसत. पार्टनर विजय पाटील (स्ट्रक्चरल इंजिनिअर) यांच्याशी त्यांनी अर्धशकत भागीदारी केली व 'बेनाडीकर-पाटील' ही फर्म नावारूपास आणली.

बाळने आपल्या लग्नात मला शाळकरी मित्र म्हणून आमंत्रित केले होते. तेव्हा त्याला मनसबदार व दरकदार यांनी मानवंदना व खडितालीम दिलेली पाहून मी हरकून गेलो होतो. मी माझ्या 'वास्तुपर्व'मध्ये मौनी महाराज मठावर लेख लिहिला तेव्हा तो मला आवर्जून भेटायला आला. तब्येत तंदुरुस्त असताना त्याची अचानक झालेली एक्झिट मनाला जिव्हारी लागून गेली. तो जिव्हाळा, मैत्रीतला ओलावा आता संपलेला आहे.

**- मोहन शं. वायचळ**
(आर्किटेक्ट)

10 OCT 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'दूरशिक्षण'तर्फे यंदापासून चार नवे ऑनलाईन अभ्यासक्रम

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रामार्फत या वर्षापासून चार अभ्यासक्रम ऑनलाईन स्वरूपात सुरू करण्याच्या प्रस्तावास मंजुरी दिल्याची माहिती केंद्राचे संचालक डॉ. ए. एम. सरवदे यांनी दिली आहे. एमबीए, एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) आणि एम.एस्सी. (संगणकशास्त्र) असे अभ्यासक्रम आहेत.

डॉ. सरवदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजी विद्यापीठास 'नॅक' (बंगळूर) यांचे 'ए++' मानांकन प्राप्त झाल्यानंतर नवी दिल्ली येथील अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून ऑनलाईन अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता मिळालेली आहे. यामध्ये नियमित 'एमबीए'च्या बरोबर ऑनलाईन एमबीए, एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) आणि एम.एस्सी. (संगणकशास्त्र) अभ्यासक्रमांचा समावेश आहे. यामुळे देश-विदेशातील विद्यार्थ्यांनाही शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन शिक्षण घेण्याची संधी प्राप्त होणार आहे. अभ्यासक्रम सध्याच्या बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवण्यास उपयुक्त असल्याने त्यांना विद्यार्थ्यांचा उत्साही प्रतिसाद लाभेल.

अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सहकार्य लाभले.